


Email : attalsanket2023@gmail.com

दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET


मकर संक्रांतीच्या
हार्दिक शुभेच्छा!
-संपादक




RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२७९ ■ मंगळवार, दि. १४ जानेवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -279 ■ Tuesday, 14 Jan 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-


## नामांतराचा लढा हा केवळ विद्यापीठाची पाटी बदलणारा नव्हता, तर तो समता, स्वातंत्र्य, बंधुभाव पुढे नेणारा लढा होता

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन. त्यानिमित्ताने आज विद्यापीठ गेटवर राज्यभरातून अनेक अनुयायी एकत्र येतात आणि बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन केले जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठाला देण्यासाठी सुमारे १७ वर्षे आंदोलन झाले. नामांतराचा लढा हा केवळ विद्यापीठाची पाटी बदलणारा नव्हता, तर तो समता, स्वातंत्र्य, बंधुभाव पुढे नेणारा लढा होता. १९९४ साली डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नामांतर झाले. तो नामविस्तार दिन १४ जानेवारी म्हणून मोठ्या उत्साहाने छत्रपती संभाजीनगर येथे साजरा केला जातो. यंदा देखील दरवर्षी प्रमाणे मोठ्या संख्येनं अनुयायी अभिवादनासाठी येण्याची शक्यता आहे.

**नामांतराचा लढ्याच्या इतिहासावर एक नजर टाकूयात...**

नामांतराचा लढा हा केवळ विद्यापीठाची पाटी बदलणारा नव्हता, तर तो समता, स्वातंत्र्य, बंधुभाव पुढे नेणारा लढा होता.

विद्यापीठाचा नामांतर हे केवळ आंदोलन नव्हते, तर त्याला सामाजिक लढ्याचे स्वरूप आलं होतं. १९७२ला दलित पँथरची स्थापना झाली. गायरान जमिनी मिळाव्यात, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ व्हावी, यासह इतर मागण्यांसाठी दलित पँथरचं आंदोलन सुरू होतं. त्या बरोबरच छत्रपती संभाजीनगरच्या मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे, ही मागणीनं जोर धरला.

१९७४च्या मराठवाडा विकास आंदोलनात नामांतराची मागणी झाली. दलित युवक आघाडी ही नामांतराच्या मागणीचा पाठपुरावा करत असे. १९७७ला तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी मागणीची दखल घेतली.

१९७७ ला तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी या मागणीची दखल घेतली. नामांतराचं आश्वासनही दिलं. १९७८ला महाराष्ट्रात सरकार बदललं. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुलोद सरकार सत्तारूढ झालं होतं . विधान परिषदेत आमदार पा. ना. राजभोज यांनी मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करावे, अशी मागणी लावून धरली.

२७ जुलै १९७८ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अशी घोषणा झाली. दलित पँथर नेते प्रा. अरुण कांबळे यांनी या नामविस्तारास विरोध दर्शविला. पँथरला निर्भेळ नामांतर हवे होते.

रात्रीतून नामांतर विरोधात दंगली सुरू झाल्या. एक दीड वर्ष मराठवाडा धुमसत होता. या आंदोलनात अनेकांनी प्राणांची आहुती दिली.

शेवटी एका विद्यापीठाची फाळणी झाली. एकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद तर दुसऱ्याला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अशी विस्तारित नावं दिली गेली. तो नामविस्तार दिन १४ जानेवारी म्हणून मोठ्या उत्साहाने औरंगाबाद येथे साजरा केला जातो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठाला देण्यासाठी सुमारे १७ वर्षे आंदोलन झाले. नामांतराचा लढा हा केवळ विद्यापीठाची पाटी बदलणारा नव्हता, तर तो समता, स्वातंत्र्य, बंधुभाव पुढे नेणारा लढा होता.



## पहिल्या दिवशी तब्बल १.५ कोटी लोकांनी केले महास्नान

**लखनऊ :** भक्तीचे महापर्व महाकुंभाची सुरूवात आजपासून प्रयागराजमध्ये झाली आहे. आज पौष पोर्णिमेला अमृतस्नान आहे. सकाळपासून भक्तगण गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वती नदीच्या संगमामध्ये डुबकी घेत आहे. आजा अपेक्षा होती की साधारण एक कोटीच्या जवळपास भक्तगण येथे स्थान कतील. मात्र उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ट्वीटमध्ये माहिती दिली की आज तब्बल दीड कोटी लोकांनी त्रिवेणी संगमामध्ये स्नानाचे पुण्य लाभ मिळवले आहे.

**१.५ कोटी लोकांनी घेतले स्नानाचे पुण्य**

मुख्यमंत्री योगीने आपल्या ट्वीटमध्ये लिहिले की, मानवतेचे मंगलपर्व महाकुंभ २०२५मध्ये पौष पोर्णिमेच्या शुभ पर्वाला या संगमावर स्नान करण्याचे भाग्य मिळवणारे सर्व, कल्पवासी, भक्तगण यांचे हार्दिक अभिनंदन. प्रथम स्नानाच्या पर्वावर आज १.५० कोटी लोकांनी या ठिकाणी स्नानाचा पुण्यलाभ घेतला.

**आजपेक्षा मोठे असेल मकर संक्रांतीचे स्नान**

उत्तर प्रदेशचे मुख्य सचिव मनोज कुमार सिंह म्हणाले, मकर संक्रांतीचे स्नान आजच्या स्नानापेक्षा मोठे असेल. दीड वर्षांपासून राज्य सरकार या कुंभ मेळ्यासाठी तयारी करत होते. प्रयागराज शहरात आणि ४ हजार हेक्टरमध्ये पसरलेल्या क्षेत्रात ७ हजार कोटी रूपये खर्च करण्यात आले आहेत.

**कुंभमध्ये स्नान केल्याने मिळते पापांपासून मुक्ती**

अशी मान्यता आहे की कुंभ मेळ्यामध्ये स्नान केल्याने पापांपासून मुक्ती मिळते. समुद्रमंथनातू निघालेले अमृत मिळवण्यासाठी देव आणि राक्षस यांच्यात १२ वर्षे युद्ध सुरू होते. या युद्धादरम्यान त्या कलशातील अमृत ज्या ठिकाणी पडले तेथे कुंभ मेळा आयोजित केला होते. १२ वर्षे युद्ध चालल्याने कुंभ दर १२ वर्षांनी एकदा येतो. महाकुंभमधील स्नान हे शाही स्नान म्हणून ओळखले जाते.

### महाकुंभमेळा भारतीय आध्यात्मिक परंपरेचा भव्य उत्सव : पंतप्रधान मोदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या सोहळ्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय आध्यात्मिक परंपरेचा हा भव्य उत्सव तुम्हा सर्वांच्या जीवनात नवीन ऊर्जा आणि उत्साह घेऊन येईल अशी आशा आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले आहे. भारतीय मूल्ये आणि संस्कृती जपणाऱ्या कोट्यवधी लोकांसाठी हा एक अतिशय खास दिवस आहे. आपल्या श्रद्धा आणि संस्कृतीशी संबंधित या दिव्य प्रसंगी, मी सर्व भक्तांना माझे मनापासून अभिवादन आणि शुभेच्छा देतो, असे पंतप्रधान मोदी यांनी पोस्टमध्ये लिहिले आहे.

**‘महाकुंभ हा श्रद्धा, विश्वास आणि वैदिक परंपरांचा अमृत कलश’**

महाकुंभ हा श्रद्धा, विश्वास आणि वैदिक परंपरांचा अमृत कलश आहे. जिथे संस्कृतींचा संगमदेखील आहे. श्रद्धा आणि समरसतेचा संगमही आहे. ‘विविधतेत एकता’चा संदेश देणारा म हाकुंभ-२०२५ प्रयागराजमध्ये मानवतेच्या कल्याणासोबतच सनातनचा साक्षात्कार घडवून आणत आहे, असे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी म्हटले आहे.

## नायलॉन मांजा आढळल्यास गुन्हा दाखल करणार

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र शासनाच्या अधिसुचनेनुसार पक्का धागा म्हणुन ज्ञात असलेल्या, पतंग उडविण्यासाठी वापरला जाणा-या प्लास्टिक पासुन किंवा (सिंथेटिक) कृत्रिम पदार्थापासून तयार केलेला चिनी मांजा, चिनी दोर किंवा नायलॉन किंवा (सिंथेटिक) कृत्रिम मांजा हे, मनुष्य जातीला आणि पक्षांना इजा पोहचत असल्याचे व घातक ठरत असल्याचे सर्वसाधारणपणे ज्ञात आहे. अशा धाग्यांचे जैविकरित्या विघटन होत नसल्यामुळे मलप्रणाली, जलनिस्सारण यंत्रणा, नद्या, ओढे, जलाशय, अवरोधित होतात आणि जैविक विघटन न होणारे पदार्थ खाल्याने जनावरे गुदमरतात तसेच पशुपक्ष्यांना व नागरिकांना इजा पोहचते यांसह पर्यावरणाचे अनेक मार्गाने नुकसान होते.

संदर्भ : - १. राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली मुळ अर्ज क्र.३८४/२०१६

२. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ क्रमांक ५९ दि. ०१ मार्च, २०२३

३. शासन निर्णय क्र. PIL-2021/CR-14/TC-1 Dt.25/08/2023

संदर्भ क्र.०१ च्या आदेशान्वये



मनुष्य जातीवर व पक्ष्यांवर होणारे प्रतिकूल परिणाम टाळण्याच्या दृष्टीने अशा प्लास्टिकच्या किंवा (सिंथेटिक) कृत्रिम धाग्याचा वापर करण्यास प्रतिबंध घालण्याबाबत आदेश दिले संदर्भ क्र. ०२ अधिसुचना व संदर्भ क्र.०३ च्या शासन निर्णयानुसार प्लास्टिकच्या किंवा (सिंथेटिक) कृत्रिम धाग्यावर प्रतिबंध घालण्यासाठी महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका उपआयुक्त, दुकाने आस्थापना अधिकारी आणि निरिक्षक, स्वच्छता निरिक्षक, आरोग्य निरिक्षक, आरोग्य अधिकारी, प्रभाग अधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला अन्य कोणताही अधिकारी यांना त्यांच्या संबंधित अधिकार क्षेत्रात, उक्त विनिमयांच्या तरतुदींच्या अंम लबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे.

या अनुषंगाने प्लास्टिकच्या किंवा (सिंथेटिक) कृत्रिम धागा / नायलॉन मांजा विक्री करतांना, बाळगतांना, वापरतांना आढळल्यास संबंधित दुकानदार/आस्थापना / नागरीकांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. तसेच गरज भासल्यास संबंधितावर गुन्हे दाखल करण्यात येईल.

असे अतिरिक्त आयुक्त्-१ रणजीत पाटील यांनी कळविले आहे.

# आपची हॅट्ट्रिक की भाजपचे पुनरागमन ?

देशाची राजधानी दिल्ली नवीन सरकार निवडण्यासाठी सज्ज आहे. आम आदमी पक्ष तिसऱ्यांदा सत्तेवर येण्यासाठी मैदानात उतरला आहे. भारतीय जनता पक्षाला २७ वर्षांचा वनवास संपवून सत्तेवर यायचे आहे. तर काँग्रेसला स्वत:चे प्रदर्शन चांगले करावयाचे आहे.

दिल्लीची जनता यापैकी कुणाची इच्छा पूर्ण करते हे निकालातून स्पष्ट होईलच. उत्तर भारत कडाक्याच्या थंडीमुळे गारठला असतानाही निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त राजीव कुमार यांनी विधानसभेची निवडणूक जाहीर करून दिल्लीचे तापमान वाढविले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. दिल्लीचे वातावरण पूर्णपणे तापले आहे. आम आदमी पक्षाने सर्व ७० उमेदवारांची घोषणा केली आहे. भाजपची दुसरी यादी सुध्दा आली आहे. आणि काँग्रेसनेही काही उमेदवार जाहीर केले आहेत. एवढेच नव्हे तर, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या पक्षांनीसुध्दा उमेदवार उतरविले आहेत. असे असले तरी दिल्लीच्या सिंहासनाचा सामना हा तीन राष्ट्रीय पक्षांत होणार आहे. ते म्हणजे आप, भाजप आणि काँग्रेस. याशिवाय क्षेत्रीय पक्ष सुध्दा मैदानात आहेत. परंतु दिल्लीच्या सिंहासनावर या तीन पक्षांपैकी कुणी तर एक बसणार आहे. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल दिल्लीची सत्ता तिसऱ्यांदा मिळविण्यासाठी मैदानात उतरले आहेत. तर, भारतीय जनता पक्ष २७ वर्षांचा वनवास संपविण्यासाठी पूर्ण ताकद लावून रिंगणात उतरला आहे. काँग्रेसची समस्या वेगळी आहे. काँग्रेसला सत्तेपेक्षा स्वत:चा परफॉर्मन्स सुधारायचा आहे. काही आमदार निवडून आले तर खूप होईल. दिल्लीतील ७० जागांसाठी ५ फेब्रुवारी रोजी एकाच टप्प्यात विधानसभेची निवडणूक होणार आहे. तर, दिल्लीची जनता सत्तेची धुरा कुणाच्या हाती देते हे ८ फेब्रुवारी रोजी निकालातून स्पष्ट होईल. मात्र, यासाठी २०१३, २०१५ आणि २०२० मध्ये झालेल्या निवडणुकीतील राजकीय पक्षांच्या स्थितीवर नजर टाकणे महत्त्वाचे आहे. दिल्लीत २०१३ पासून आम आदमी पक्षाचे सरकार आहे. दिल्लीतील आम आदमी पक्षाच्या सरकारचा हा तिसरा कार्यकाळ आहे. २०१३ मध्ये आपने २८, भाजपने ३१ आणि काँग्रेसने ८ जागा जिंकल्या होत्या. पण, आपने काँग्रेसशी हातमिळवणी करून सरकार स्थापन केले होते. मात्र, हे सरकार फार काळ टिकू शकले नाही. अरविंद केजरीवाल यांनी राजीनामा दिल्यामुळे २०१५ मध्ये दिल्लीत विधानसभा निवडणुका झाल्या. यावेळी आम आदमी पक्षाला प्रचंड बहुमत मिळाले. ७० पैकी ६७ जागांवर आपचा विजय झाला. भाजपचे तीन आमदार निवडून आले होते आणि काँग्रेस भुईसपाट झाली होती. २०२० च्या विधानसभा निवडणुकीतही केजरीवाल यांच्या 'आप'ने पुन्हा चांगले यश मिळविले. यावेळी आपला ७० पैकी ६२ जागा मिळाल्या. मात्र, काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही. अंमलबजावणी संचालनालयाने मद्य धोरण प्रकरणी केजरीवाल यांना तुरूंगात टाकले. मात्र, तुरूंगातून सुटल्यानंतर केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि आतिशी मर्लोना यांना मुख्यमंत्रिपदी बसवून महिला कार्ड खेळले. महत्त्वाचा मुद्दा असा की, विधानसभेची निवडणूक जिंकण्यासाठी केजरीवाल यांनी तेच कार्ड खेळले आहे जे कार्ड खेळून भाजपने मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राची निवडणूक जिंकली.

आपने दिल्लीत सरकार आले तर महिलांना २१०० रूपये देण्याची घोषणा केली आहे. यानंतर काँग्रेसनेही २५०० देण्याची घोषणा केली. भाजप महिलांना खूश करण्यासाठी काय करणार? हे अद्याप जाहीर झालेले नाही. परंतु, केजरीवाल यांनी खेळलेला डाव यशस्वी होईल काय? असा प्रश्न सर्वांना पडला आहे. या तिन्ही निवडणुकांमधील मतदानाच्या टक्केवारीवर नजर टाकली तर २०१३ मध्ये काँग्रेसला २४.५५ टक्के, आपला २९.४९ टक्के तर भाजपला ३३.०७ टक्के मते मिळाली. तर २०१५ मध्ये आपला ५४.३४ टक्के, भाजपला ३२.१९ टक्के आणि काँग्रेसला ९.६५ टक्के मते मिळाली होती. यावरून असे दिसून येते की, आपच्या मतपेढीत मोठी घसरण झाली आहे. तर भाजपला आपला मतदानाचा टक्का राखण्यात यश आले आणि २०२० च्या निवडणुकीत त्याचा मतदानाचा टक्का वाढला आहे. अशात काँग्रेसचा परफॉर्मन्स सुधारला तर त्याचा फटका सरळ आम आदमी पक्षाला बसणार आहे.असे झाले तर दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपचा मार्ग सोपा होईल. याशिवाय, आम आदमी पक्ष दिल्लीत १० वर्षांहून अधिक काळ सत्तेत आहे, यामुळे आपला सत्ताविरोधी लाटेचा सामना करावा लागू शकतो. यासाठी आपने दोन डझन आमदारांची तिकिटे कापून नवीन लोकांना संधी दिली आहे. यामुळे आप आणि भाजप यांच्यात अटीतटीची लढत होणे जवळपास नक्की आहे. काँग्रेसची भूमिका नेमकी कशी असते हे निकालांअंतीच स्पष्ट होऊ शकेल. थोडक्यात, दिल्लीची निवडणूक खूपच रंजक असणार आहे. यावेळी दिल्लीत १ कोटी ५५ लाख २४ हजार ८५८ मतदार आहेत. यात महिला मतदारांची संख्या

७१ लाख ७३ हजार ९५२ आहे. अर्थात, देशातील इतर अनेक राज्यांप्रमाणे, दिल्लीतही महिला मतदार निवडणुकीतील विजय किंवा पराभवात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. दिल्लीपेक्षा खूप मोठे आणि महत्त्वाचे राज्य असलेल्या पंजाबमध्ये आपचे सरकार आहे. पण देशाची राजधानी दिल्लीत आपचे सरकार आणता आले नाही तर त्याचा फटका थेट केजरीवाल यांच्या प्रतिमेवर पडल्याशिवाय राहणार नाही. या निवडणुकीत आपचा पराभव झाला तर केजरीवाल यांची पक्षावरील पकड कमकुवत होईल आणि इंडिया आघाडीतील त्यांचे वर्चस्वही कमकुवत होईल. कारण इंडिया आघाडीतील सर्वात मोठा पक्ष असलेल्या काँग्रेसने लोकसभा निवडणुकीदरम्यान अनेक राज्यांमध्ये आपसोबत आघाडी केली होती. मात्र, विधानसभेच्या निवडणुकीत दोन्ही पक्ष वेगवेगळे लढत आहेत.

# मकरसंक्रांत : एक सामाजिक सण !

## (मकरसंक्रांती विशेष)

मकरसंक्रांतीला महाराष्ट्रात नुसतेच संक्रांत म्हणतात. मकरसंक्रांती- उत्तरायण माघी संक्रांती, ज्याला पश्चिम बंगालमध्ये मोकोर सोनक्रांती म्हणूनही ओळखले जाते आणि नेपाळमध्ये माघे संक्रांती, येथे संक्रांती म्हणजे हस्तांतरण, हा दिवस सूर्याचा मकर राशीत संक्रमण दिवस मानला जातो. आता हिंदू दिनदर्शिकेमध्ये सूर्य उत्तरेकडे सरकतो. सूर्य या देवतेला समर्पित, अनेक स्थानिक बहु-दिवसीय उत्सव संपूर्ण भारतात आयोजित केले जातात. ग्रेगेरियन दिनदर्शिकेनुसार जानेवारी म हिन्यात सूर्य मकर राशीत प्रवेश करतो, तो दिवस दरवर्षी साजरा केला जातो. सूर्याच्या मकर राशीत प्रवेशाचा तो पहिला दिवस आहे. लीप वर्षांमध्ये एक दिवस जोडल्यामुळे, मकर संक्रांतीची तारीख थोडी बदलू शकते. लीप वर्षात ते १५ जानेवारीला येते, अन्यथा १४ जानेवारीला असते. मकर संक्रांतीशी संबंधित सण आसाममध्ये माघ बिहू, पंजाबमध्ये माघी, हिमाचल प्रदेशात माघी साजी, जम्मूमध्ये माघी संग्रांद किंवा उत्तरायण, हरियाणामध्ये सक्रत, राजस्थानमध्ये सकरत, मध्य भारतात सुकरात, पोंगल अशा विविध नावांनी ओळखले जातात. तामिळनाडूमध्ये उत्तरायण, गुजरात आणि उत्तर प्रदेश, उत्तराखंडमध्ये घुघुटी, बिहारमध्ये दही चुरा, ओडिशामध्ये मकर संक्रांती, कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा, पश्चिम बंगाल- ज्याला पौष संक्रांती देखील म्हणतात, उत्तर प्रदेश -खिचडी संक्रांती देखील म्हणतात. उत्तराखंड- ज्याला उत्तरायणी देखील म्हणतात किंवा सोप्या भाषेत, आंध्र प्रदेश आणि तेलंगणामधील संक्रांती, माघे संक्रांती- नेपाळ, सोंगक्रान- थायलंड, थिंगयान- म्यानमार, मोहन सोंगक्रान- कंबोडिया आणि शिशूर, सेनक्राथ- काश्मीर आदी.

मकर संक्रांती हा सामाजिक सण आहे. हा सण रंगीबेरंगी सजावट, ग्रामीण मुलांनी घरोघरी जाणे, गाणी गाणे आणि काही भागात भेटवस्तू मागणे, मेळे, नृत्य, पतंग उडवणे, शेकोटी पेटवणे आणि मेजवानी यांसारख्या सामाजिक उत्सवांनी साजरी केली जाते. इंडोलॉजिस्ट डायना एल. एक यांच्या मते मघा मेळ्याचा उल्लेख हिंदू महाकाव्य महाभारतात आहे. अनेक निरीक्षक पवित्र नद्या किंवा तलावांवर जातात आणि सूर्याला धन्यवाद देण्यासाठी स्नान करतात. दर बारा वर्षांनी, हिंदू कुंभमेळ्यासह मकर संक्रांत पाळतात- जगातील सर्वात मोठ्या सामूहिक तीर्थक्षेत्रांपैकी एक, अंदाजे ६० ते १०० दशलक्ष लोक या कार्यक्रमाला उपस्थित राहतात. या कार्यक्रमात, ते सूर्याला प्रार्थना करतात आणि गंगा व यमुना नदीच्या प्रयागराज संगमावर स्नान करतात, या परंपरेचे श्रेय आदि शंकराचार्यांना दिले जाते.

दरवर्षी २१-२२ डिसेंबरला सूर्याची किरणे पृथ्वीच्या साडेतेवीस दक्षिण या अक्षांशावर लंबरूपात पडतात आणि त्या दिवसापासून सूर्याचे उत्तरायण सुरू होते. इसवी सनाच्या सुरुवातीच्या वर्षांत सूर्य त्याच सुमारास मकर राशीमध्ये संक्रमण- प्रवेश करीत असे, त्यामुळे साडेतेवीस दक्षिण या अक्षवृत्ताला मकरवृत्त म्हणू लागले. पुढच्या काळात सूर्याच्या उत्तरायणाची सुरुवात २१-२२ डिसेंबरलाच होत राहिली, तरी पृथ्वीच्या परांचन गतीमुळे सूर्याच्या मकरसंक्रमणाची तारीख पुढेपुढे जात राहिली. साहजिकच हिंदूंच्या मकरसंक्रांत या सणाची तारीख बदलत राहिली. मकरसंक्रांतीच्या दिवशी सूर्य धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो. सूर्याचे उत्तरायण आधीच म्हणजे २१-२२ डिसेंबरलाच सुरू झालेले असते. अर्थातच त्या दिवसापासून सूर्याचे उत्तरायण सुरूच असते. पृथ्वीवरून पाहिले असता २१-२२ डिसेंबरपासून सूर्याच्या उगविण्याची जागा दिवसेंदिवस उत्तरेकडे सरकत जाते. महाभारतात कुरु वंशाचे संरक्षक भीष्म हे बाणांच्या शय्येवर- शरशय्येवर उत्तरायणाची वाट पहात पडून होते. त्यांना इच्छामरणाचे वरदान होते. ज्या दिवशी उत्तरायण सुरू झाले त्यादिवशी त्यांनी प्राणत्याग




केला. भारतीय परंपरेत उत्तरायणाचा काळ दक्षिणायनापेक्षा अधिक शुभ मानला जातो. संक्रांत ही एक देवता मानली गेली असून प्रतिवर्षी ती येताना वेगवेगळ्या वाहनावर बसून येते, अशी सम जूत प्रचलित आहे. कधी तिचे वाहन हत्ती, कधी गाढव तर कधी डुक्कर असते. मात्र यामागे नेमका काय कार्यकारणभाव आहे? हे मात्र नोंदविलेले दिसून येत नाही. संक्रांतीचा आदला दिवस महाराष्ट्रात भोगी या नावाने साजरा होतो. या हवामानात उपलब्ध सर्व शेंगभाज्या, फळभाज्या यांची तिळाचा कूट घालून केलेली मिश्र भाजी, तीळ लावलेली बाजरीची भाकरी, लोणी अणि मुंगाची खिचडी असे पदार्थ या दिवशी आवर्जून केले जातात. संक्रांतीच्या दिवशी गुळाची पोळी आणि तिळगुळाचे विशेष महत्त्व असते.

महाराष्ट्रात हा सण तीन दिवस साजरा करतात. यास भोगी- सामान्यतः १४ जानेवारी, संक्रांत- सामान्यतः १५ जानेवारी व किंक्रांत- सामान्यतः १६ जानेवारी, अशी नावे आहेत. संक्रांतीस आप्तस्वकीयांना, मित्रमंडळींना आणि लहान मुलांना तिळगुळ, तिळाचे लाडू, वड्या किंवा तिळाचा हलवा आणि स्त्रियांना वाण वाटून 'तिळगुळ घ्या आणि गोड बोला' असे सांगून स्नेह वृद्धिंगत होण्याची शुभकामना दिली जाते. विवाहित स्त्रिया या दिवशी आणि या दिवसापासून हळदीकुंकू करतात. रथसप्तमी हा संक्रांतीच्या हळदीकुंकवाचा शेवटचा दिवस असतो. मराठी स्त्रिया संक्रांतीच्या दिवशी आवर्जून काळी साडी नेसतात. आसाम- भोगाली बिहू, पश्चिम बंगाल- मकर संक्रान्ति, ओरिसा - मकर संक्रान्ति, पश्चिम भारतात- गुजरात व राजस्थान - उतरायण- पतंगनो तहेवार- पतंगांचा सण, गुजरातमध्ये या दिवशी धान्य, तळलेल्या मिठाया, खाद्यपदार्थ बनवले व दान केले जातात. गुजरातेत या दिवशी गहू, बाजरी यांच्या खिचड्या बनवल्या जातात.



– संकलन व शब्दांकन –
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

गुजरातमध्ये मकरसंक्रांतीचा दिवस उत्तराण म्हणून ओळखला जातो. या दिवशी घरोघरी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण पतंग उडवतात. हा पतंगोत्सव पाहण्यासाठी जगभरातील पर्यटक गुजरातला भेट देतात. दक्षिण भारतात- कर्नाटक, आंध्र प्रदेश - संक्रांति, तमिळनाडू - पोंगल, दक्षिण भारतात पोंगल सण ३ दिवस साजरा होतो. भोगी पोंगल या दिवशी होळी पेटवून त्यात घरातील अनावश्यक वस्तू टाकतात. मुली त्या होळीभोवती फेर धरून नाचतात. सूर्य पोंगल या दिवशी तांदूळ, गूळ, दूध यांची खीर करून तिचा नैवेद्य दाखवितात. मुट्टू किंवा कनुनु पोंगल या दिवशी गोठ्यातील जनावरांची पूजा केली जाते. याच दिवशी भावाच्या चांगल्या आयुष्यासाठी बहिणी पूजा करतात व भावाला ओवाळतात. शबरीमला मंदिरात मकर वल्लाकु उत्सव होतो. भारताबाहेरील देशात- नेपाळम ध्ये, थारू लोक - माघी, अन्य भागात माघ संक्रान्ति, थायलंड- सोंग्क्रान, लाओसठ- पि मा लाओ, म्यानमार- थिंगयान साजरा करतात. मकरसंक्रांतीच्या दिवशी कलकत्ता शहरानजीक गंगा नदी जेथे बंगालच्या उपसागरास मिळते, त्या गंगासागर नावाच्या ठिकाणी गंगासागर यात्रा आयोजित केली जाते. हिमालयातील देवप्रयाग, मुनी की रेती, कीर्तिनगर, व्यासघाट या ठिकाणी संक्रातीच्या निमित्ताने मेळे भारतात. या दिवशी केरळमधील शबरीमला डोंगरावर मकरज्योतीचे दर्शन घेण्यास अनेक भाविकांची गर्दी होते. मकर संक्रांतीच्या आदल्या दिवसाला भोगी असे म्हणतात. भोगी हा आनंदाचा आणि उपभोगाचा सण म्हणून मानला जातो. या दिवशी सकाळी आपले घर तसेच घरासभोवतालचा परिसर स्वच्छ केला जातो. दरवाजासमोर रांगोळी काढतात. घरातील सर्व जण अभ्यंगस्नान करून नवीन कपडे परिधान करतात. महिला नवीन अलंकार धारण करतात. सासरच्या मुली भोगीचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी या दिवशी माहेरी येतात. कुटुंबातील सर्वजण एकत्र येऊन भोगीचा आनंदोत्सव साजरा करतात. दुपारी जेवणाचा बेतही खास भोगीचा असतो. तीळ लावलेल्या भाकऱ्या, लोणी, पापड, वांग्याचे भरीत, चटणी आणि खमंग खिचडी असा लज्जतदार खास बेत असतो. प्रथम या पदार्थाचा देवाला नैवेद्य दाखवून सर्वजण एकत्र जेवायला बसतात. वांग्या-बटाट्याच्या जोडीला हिरवागार घेवडा, पापडी, हरबऱ्याचे हिरवेगार दाणे, कोनफळ, लालचुटुक गाजरे, भुईमुगाच्या आणि इतर सर्व प्रकारच्या शेंगा यांच्या भेसळभाजीला भोगीची भाजी म्हणतात. दक्षिण भारतात हा दिवस भोगी पोंगल म्हणून साजरा करतात. या दिवशी इंद्राची पूजा करून आप्तजनांसह मिष्टान्न भोजन करण्याची प्रथा आहे. मकर संक्रांतीचा सण संपूर्ण भारतात साजरा केला जातो. या दिवशी दान देण्याला विशेष महत्त्व आहे. देवीपुराणातील हा श्लोक साक्ष देतो-

'संक्रांतौ यानि दत्तानि दव्यकव्यानि मानवै:।
तानि नित्यं ददात्यर्कः पुनर्जन्मनि जन्मनि।।'

मकर संक्रांतीच्या दिवशी जी माणसे दान देतात आणि हव्यकव्ये करतात, त्या-त्या वस्तू सूर्य त्यांना प्रत्येक जन्मात देत असतो, अशी खुळी समज आहे. आधुनिक कालात दान देण्याच्या गोष्टींच्या यादीमध्ये विद्यादान, श्रमदान, रक्तदान, वस्त्रदान, अन्नदान, नेत्रदान याही गोष्टींचा समावेश व्हावयास हवा. यादिवशी घरातील आणि गावच्या मंदिरातील देवाला तीळ-तांदूळ वाहतात. सुगडात गहू, उसाचे तुकडे, हळकुंडे, कापूर, बोरे, द्रव्य इत्यादी वस्तू घालून ते दान देण्याची प्रथा आहे. मकर संक्रांतीच्या दिवशी नववधूला हलव्याचे दागिने घालून जावयाला तिळगूळ आणि आहेर देण्याची पद्धत महाराष्ट्रात आहे. तिळावर साखरेचा पाक चढवून हलवा करण्याची प्रथा आहे. या दिवशी महिला एकत्र येऊन हळदीकुंकू समारंभ करतात, तिळगुळ वाटतात. महाराष्ट्रात अशा समारंभात प्रत्येकीला काही तरी वस्तू भेट देण्याची प्रथा आहे. लहान मुलांना लुटले जाते. या दिवशी महिला काळे वस्त्र परिधान करतात. मकर संक्रांतीचे दिवस हे थंडीचे असतात. काळ्या रंगाचे वस्त्र हे उबदार असते. काळ्या मोठ्या रात्रीला निरोप देण्याच्या उद्देशानेही असे काळ्या रंगाचे वस्त्र नेसण्याची प्रथा पडली असावी. मकर संक्रांतीचा सण हा स्नेहवर्धनाचा सण असतो. मकर संक्रांतीच्या दिवसापासून उत्तरायणारंभापासून मोठे झालेले दिनमान जाणवू लागते. पूर्वी इलेक्ट्रिसिटी नव्हती. त्या वेळी माणसे सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतच कामे करावयाची. दिनमान वाढत जाणार म्हणजे अधिक काम करण्याची संधी मिळणार! म्हणून मकर संक्रांतीचा सण हा आनंदाचा सण म्हणून साजरा केला जातो. थंडीच्या दिवसात तीळ हे अधिक आरोग्यदायी असतात. 'फरगीविह अ‍ॅन्ड फरगेट' हा संदेश या सणाद्वारे दिला जातो. जीवनात आनंद फुलवण्याचा प्रयत्न केला जातो. महाराष्ट्रात या दिवशी लहान मुलांनाही हलव्याचे दागिने घालून बोरन्हाण घालण्याची- त्यालाच काही ठिकाणी लूट म्हणतात, ही एक प्रथा आहे. बंगालमध्ये या दिवशी काकवीत तीळ घालून तिळुवा नावाचा पदार्थ तयार करून इष्ट मित्राना देतात. तसंच तांदुळाच्या पिठात तूप-साखर मिसळून पिष्टक नावाचा पदार्थ तयार करून तोही वाटतात. मकर संक्रांतीच्या दिवशी प्रयाग इथे मोठी यात्रा भरते. अनेक भाविक गंगास्नान करतात. दक्षिणेतही ताम्रपर्णी नदीमध्ये स्नान करण्यासाठी अनेक लोक तिरुवनवेल्ली जिल्ह्यामध्ये जात असतात. हिमालयाच्या सरूळ भागात या दिवशी पिठाचे पक्षी करून ते तुपात तळतात व लहान मुलांच्या गळ्यात बांधतात. दुसऱ्या दिवशी ते पक्षी कावळ्याना खाऊ घालतात. दक्षिण भारतात हा दिवस सूर्य पोंगल किंवा पेरूम पोंगळ म्हणून साजरा करतात. या दिवशी अंगणात दुधातही तांदुळाची खीर शिजवतात. खिरीला उकळी आली, की 'पोंगल ओ पोंगल' म्हणून ओरडतात. मकरसंक्रांतीच्या दिवशी संक्रांतीदेवीने संकारसूर या राक्षसाचा वध करून सर्व लोकांना सुखी केले अशी कथा आहे. संक्रांतीचा दुसरा दिवस किंक्रात म्हणून साजरा करतात. संक्रांतीदेवीने मकर संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी किंकरासुर नावाच्या राक्षसाला ठार मारले आणि त्याच्या जाचातून प्रजेला मुक्त केले. म्हणून हा दिवस किंक्रांत म्हणून पाळला जातो. पंचागात हा दिवस करिदिन म्हणून दाखवलेला असतो. हा दिवस शुभकार्याला घेतला जात नाही. या दिवशीही स्त्रिया हळदीकुंकू समारंभ साजरा करतात.

दक्षिण भारतात किंक्रांतीचा दिवस 'मट्टू पोंगल' म्हणून साजरा करतात. या दिवशी गाई-बैलांना स्नान घालून त्यांच्या गळ्यात फुलांच्या माळा घालतात. त्यांच्या शिंगाना बेगड लावून त्यांना सजवतात. गुरांना दुपारी गोडधोड जेवण घालून दिवसभर त्यांना मोकळे सोडतात. संध्याकाळी त्यांची गावातून मिरवणूक काढतात. त्यानंतर नृत्यगायनाचा कार्यक्रमही केला जातो.

**!! मकरसंक्रांतीच्या सर्व भावाबहिणींना 'तिळगूळ घ्या, गोड गोड बोला' हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

# १४४ वर्षांनी मिळालेय भाग्य! कोण घेणार लाभ ?

**प्रयागराज** : महाकुंभ हा हिंदू धर्माचा महत्वाचा धार्मिक उत्सव आहे. भारतात महाकुंभचे आयोजन दर १२ वर्षांनी केले जाते. यात भाविक श्रद्धेने पवित्र नद्यांमध्ये डुबकी मारतात. त्यामुळे पुण्य मिळते, अशी श्रद्धा आहे. महाकुंभाचे आयोजन प्रयागराजच्या संगमावर, हरिद्वार येथे गंगेत, उज्जैनमध्ये शिप्रा नदी आणि नाशिकच्या गोदावरी नदीवर केले जाते. उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे महाकुंभमेळ्याला प्रारंभ झाला असून हा उत्सव १३ जानेवारी २०२५ पौष पौर्णिमेपासून सुरू होऊन २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्रीच्या पावन दिवशी सम ाप्त होईल. यावर्षीचा कुंभमेळा खास आहे, कारण तो १४४ वर्षांनी येणाऱ्या एका शुभ योगात साजरा होतोय!

पौराणिक कथेनुसार, समुद्र मंथनातून अमृतकुंभ म्हणजे अमृताने भरलेलं भांडं बाहेर आलं. हे अमृत देव आणि असुरांमध्ये वाटण्यासाठी देवतांनी कुंभ हाती घेतलं. त्यावेळी, भगवान विष्णूने मोहिनी रूप धारण करून अमृत वाचवलं आणि ते वाहून नेताना चार ठिकाणी काही थेंब जमिनीवर पडले. याच चार पवित्र ठिकाणी दर १२ वर्षांनी कुंभमेळ्याचं आयोजन केलं जातं. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या ग्रहस्थितीनुसार आणि ज्योतिषशास्त्राच्या हिशोबानं या



मेळ्याची वेळ ठरवली जाते. शतकानुशतके प्रयागराज इथं माघ मेळ्याचा उत्सव साजरा केला जातो. अनेक पुराणांमध्ये या वार्षिक मेळ्याचा उल्लेख आहे. कुंभमेळा हा फक्त धार्मिक उत्सव नसून, भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वतीच्या त्रिवेणी संगमावर होणारा हा मेळा लाखो भक्तांचं श्रद्धास्थान आहे. कुंभम ेळाच्या या ४४ दिवसांत, कोट्यवधी भाविक पवित्र स्नानासाठी प्रयागराज इथं येतील. १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारीदरम्यान 'महाकुंभ २०२५' होणार आहे. या महाकुंभातील पहिलं शाही स्नान १४ जानेवारीला 'म करसंक्राती'च्या दिवशी होणारेय. यासाठी साडेदहा किलोमीटरचा घाट तयार केलाय. त्यानंतर २९ जानेवारी: मौनी अमावस्या, ३ फेब्रुवारी: वसंत पंचमी, १२ फ्रेब्रुवारी: माघ पौर्णिमा आणि २६ फ्रेब्रुवारी: महाशिवरात्र रोजी शाही स्नानाने सांगता होणारेय.

यंदाच्या महाकुंभमेळ्यासाठी उत्तर प्रदेश सरकारनं भव्य तयारी केलीय. या कुंभमेळ्यासाठी १० हजार एकर जागेवर व्यवस्था केलीय. ६ हजार ८०० बसेस, २०० वातानुकूलित बसेस आणि लाखो भाविकांसाठी शौचालय, निवासस्थानं आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. तर कुंभमेळ्यासाठी कृत्रिम बुद्धिम त्तेचा वापर करत भाविकांच्या सुरक्षेसाठी खास ५५ पोलीस स्थानके उभारण्यात आली असून ४५ हजार पोलीस सुरक्षेसाठी तैनात केलेत. प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, स्नानाच्या दिवशी २ कोटीहून अधिक भाविक येतील. तर २९ जानेवारीला पौष अमावस्येला १० कोटी भाविक येण्याची शक्यता आहे. या उत्सवासाठी जगातील सर्वात मोठे तात्पुरते शहर उभारलेय. या शहरात ५० लाख ते १ कोटी भाविक साम ावले जाऊ शकतात, असे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सांगितलं.

यावेळच्या महाकुंभाचा विशेष योगायोग असा की, १४४ वर्षांनंतर अशी ग्रहस्थिती उद्भवलीय, ज्यामुळं हा कुंभमेळा अधिक शुभ मानला जातो. पवित्र स्नान तुम्हाला पापमुक्ती आणि आत्मिक उन्नतीचा अनुभव देतो. हा कुंभमेळा फक्त धार्मिक कार्यक्रम नसून, तो जगातील सर्वात मोठा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक सोहळा आहे. चला, आपणही या पवित्र सोहळ्याचा भाग होऊ या!

# शालेय शिक्षण विभागाकडील योजना, उपक्रम मिशन मोडवर राबवावेत -शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शालेय शिक्षण विभागाकडील योजना, उपक्रम कार्यक्रम मिशन मोडवर राबवावेत. यामध्ये १०० दिवसांचा कार्यक्रम, नवीन शैक्षणिक धोरण व आरटीआयची प्रवेश प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, अशा सूचना शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज शालेय शिक्षण विभागाच्या आढावा बैठकीत दिल्या.

मंत्री श्री. भुसे यांनी मंत्रालयातील समिती सभागृहात शालेय शिक्षण विभागाचा आढावा घेतला. यावेळी प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालक आर. विमला, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, बालभारतीचे संचालक कृष्णकुमार पाटील, माध्यमिक शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. भुसे म्हणाले, केंद्र शासनाने जाहीर केलेले नवीन



शैक्षणिक धोरण राज्यात राबविताना याची सर्व शाळांना पूर्वसूचना द्यावी. यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण संबंधितांना देण्यात यावे. अभिनव प्रयोगांद्वारे, शालेय शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण करावे. शिक्षणाच्या गुणवत्ता, सुधारणा, आणि भविष्यकालीन धोरणांवर लक्ष केंद्रित करावे. शिक्षकांच्या कार्यक्षमतेला चालना देण्यासाठी अधिक प्रशिक्षण कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी.

मंत्री श्री. भुसे म्हणाले, दहावी, बारावी परीक्षा कॉपी मुक्त व्हाव्यात हे शिक्षण विभागाचे अभियान अत्यंत प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्वच यंत्रणांनी दक्ष राहिले पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कॉपीपासून दूर राहण्यासाठी मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांना कॉपी मुक्त परीक्षा देण्यासाठी प्रेरित करावे. यासाठी जे-जे उपाय करता येतील ते करावेत, अशा सूचना शिक्षण मंत्री श्री. भुसे यांनी आढावा बैठकीत दिल्या.

शिक्षणात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी उपाययोजना करून शाळांमध्ये पाणी, शौचालय, स्वच्छता, क्रीडासुविधा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी. शिक्षण विभागातील सर्व अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एका शाळेला भेट दिली पाहिजे. या भेटीचा अहवाल त्यांनी शिक्षण विभागास सादर करावा.

पीएमश्री शाळा योजनेच्या धर्तीवर सीएमश्री शाळा योजना राबविण्यात येणार असल्याचे सांगून शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले, या योजनेंतर्गत तालुकास्तरावर किमान एक आदर्श शाळा झाली पाहिजे. या शाळेत ग्रंथालय, लॅब, क्रीडा विभाग यासाठी आवश्यक साधने असावीत. ही शाळा डिजिटल सुविधांनी परिपूर्ण असावी. जर्मनी देशात कुशल मनुष्यबळ पुरवणे या कामास गती देण्याच्या सूचना करून या योजनेच्या अंमलबजावणीसाठी संबंधितांशी पत्रव्यवहार करावा, अशा सूचना मंत्री श्री. भुसे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. बैठकीत विद्यार्थ्यांचे शिक्षण, शिक्षकांची क्षमता, शाळांच्या सुविधांची स्थिती, विविध योजनांची अंमलबजावणी, विद्यार्थ्यांना देण्यात येणारा पोषण आहार, शालेय अभ्यासक्रमाशी निगडीत बाबी, शाळाबाह्य मुलांचे सर्व्हेक्षण, शिष्यवृत्ती योजना, पवित्र पोर्टल,संच मान्यता, शाळा व्यवस्थापन यासह विभागाकडील विविध योजना व उपक्रमाची माहिती जाणून घेऊन संबंधितांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

# महाड येथून सहा बांग्लादेशी घुसखोरांना अटक

अलिबाग : महाड येथील पिंपळदरी मोरांडे वाडी येथून सहा बांग्लादेशी घुसखोरांना रायगड पोलीसांनी जेरबंद केले आहे. याच पाच पुरूष आणि एका महिलेचा समावेश आहे. महाड एमआयडीसी पोलीसांनी ही कारवाई केली आहे.

जिल्ह्यात सर्वत्र बांग्लादेशी घुसखोरांविरोधात शोध मोहीम राबविण्याचे आदेश पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले होते. त्यानुसार जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्यात बांग्लादेशी घुसखोरांचा शोध सुरू करण्यात आला होता. या शोध मोहीमे दरम्यान महाड तालुक्यातील पिंपदरी मोरांडे वाडी येथे काही बांग्लादेशी घुसखोर लपून बसल्याची माहिती गोपनीय सुत्रांमार्फत मिळाली होती. त्यानुसार महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या विशेष पथकाने पिंपळदरी मोरांडे वाडी येथील एका घरावर छापा टाकला.

तेव्हा या ठिकाणी ६ बांग्लादेशी घुसखोर आढळून आले. ते एका बांधकाम कंपनीत कामगार म्हणून कार्यरत होते. पोलीसांनी त्यांची चौकशी केली असता त्यांच्याकडे भारतात प्रवेशाची कुठलीही वैध कागदपत्र आढळून आली नाही. चौकशी साठी सर्वांना ताब्यात घेतले असता, त्यांनी बांग्लादेशातील उपासमारीला कंटाळून रोजगाराच्या शोधात गस्ती पथकांची नजर चुकवून भारतात प्रवेश केल्याचे त्यांनी मान्य केले.

माणिक तुफेझेल विशष वय ३२, नूर इस्माईल बिस्वास उर्फ सिंकदर रोने मानेरुल खान वय ३०, सागर मिराज शेख वय ३०, शांतु शकुरअली शेख वय १९ आणि शिलीम हामशेर परमणी वय ४० अशी या बांग्लादेशी घुसखोरांची नावे आहेत. त्यांच्या विरोधात देशात अवैध घुसखोरी केल्याप्रकरणी महाड एम आयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने या प्रकरणाचा तपास करत आहेत.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक संजय मुंडे, समेळ सुर्वे, सहाय्यक फ़ौजदार हनुमंत पवार, दिपक ढेपे, पोलीस हवालदार राजेश गोरेगावकर, चनप्पा अंबरगे, सिध्देश मोरे, पोलीस नाईक राजेश माने, सतीश बोटे, गणेश भैलुमे, पोलीस शिपाई सुनील पाटील, शुभम पवार, सुजील गौंधळी, सागर गुलींग, विजय दळवे, तेजश्री भोईर यांनी गुन्ह्याच्या तपासात महत्वाची भूमिका बजावली.

# ऑनर किलिंग रोखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात 'सुरक्षागृह'या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करावी - उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय जोडप्यांना लग्नानंतर सुरुवातीच्या काळात सुरक्षित निवारा महत्त्वाचा असतो. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अनेकदा गंभीर होत असून अशा प्रकरणात बेदम मारहाण ते खुनापर्यंतच्या घटना घडतात. ऑनर किलिंग रोखण्यासाठी राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात 'सुरक्षागृह' सुविधेचा निर्णय घेतला आहे. यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.

आज लातूर, संभाजीनगर, कोल्हापूर येथे झालेल्या ऑनर किलिंगच्या घटनांबाबत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली या घटनांचा आढावा घेण्यात आला. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात सुरक्षागृह (सेफ हाऊस) निर्णयाची अंमलबजावणी करावी आणि याबाबतचा सविस्तर अहवाल दि. ३० जानेवारी २०२५ पर्यंत सादर करावा. ऑनर किलिंग च्या घटनेमधील पीडित मुलींचे समुपदेशन व्हावे तसेच मनोधैर्य योजनेतून पीडित महिलेला काही मदत म्हणून लाभ देता येईल का पहावे, त्यामुळे अशा मुलींना मदत होईल. तसेच, या पीडित महिलांना सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत त्यांना प्रशिक्षण देऊन रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी आराखडा तयार करावा, अशा सूचनाही यावेळी दिल्या.

आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांची सामाजिक मानहानी, कौटुंबिक त्रास आणि ऑनर किलिंगपासून संरक्षण कण्यासाठी 'अॅट्रॉसिटी'च्या धर्तीवर 'आंतरजातीय विवाह कायद्या'ची निर्मिती करण्यासाठी समिती गठीत केली होती या समितीचे पुनर्गठन करावे.

आपत्कालीन परिस्थितीत महिलांना त्वरित मदत मिळावी यासाठी सुरू करण्यात आलेल्या महिला सुरक्षेसाठीच्या हेल्पलाइन आणि विविध समित्यांची राज्यस्तरीय प्रचार प्रसिद्धी करावी, ज्यामुळे महिलांना सुरक्षितता आणि कायदेशीर मदत वेळेत उपलब्ध होईल आणि या महिलांना कायदेशीर संरक्षण मिळेल, असेही डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले.

त्याचबरोबर, आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या काही तक्रार प्राप्त झाल्यास अप्पर पोलीस अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याने त्याचा तपास करून अहवाल सादर करावा. पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याने तक्रार दाखल करून पुढील कार्यवाही करावी आणि अशा जोडप्यांच्या संरक्षणाकरिता विशेष कक्ष आरक्षित करावेत किंवा वसतीगृह द्यावे, अशा सूचनाही उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केल्या. यावेळी, बैठकीला सामाजिक न्याय आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, महिला व बालविकास आयुक्त राहुल मोरे, संभाजीनगर विभागीय आयुक्त दिलीप गावडे, संभाजीनगर पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित कोल्हापूर, लातूर निवासी जिल्हाधिकारी संगीता टकले, सोमय मुंडे, पोलीस आयुक्त, आयुक्तालय पुणे संबंधित अधिकारी ऑनलाइन उपस्थित होते.

# यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी, युवकांनी स्वयंशिस्त पाळावी - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

## स्वामी विवेकानंद जयंती : राष्ट्रीय युवक दिवस; राज्यपालांच्या उपस्थितीत रामकृष्ण मिशनच्या विवेक कार्यशाळेचे उद्घाटन

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जन्मापासून आपण समाजाकडून सर्व काही घेत असतो. त्यामुळे समाजाच्या ऋणाची उतराई होणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे असे सांगून यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी तसेच युवकांनी स्वयंशिस्त पाळावी तसेच समाजाप्रति उत्तरदायित्वाची भावना ठेवावी असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी विद्यार्थी व युवकांना संबोधित करताना केले.

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणाऱ्या राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून मुंबईतील रामकृष्ण मठ आणि मिशनतर्फे आयोजित विवेक कार्यशाळेचा शुभारंभ राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि. १३) रामकृष्ण मिशन सभागृह, खार येथे संपन्न झाला. स्वामी विवेकानंद यांनी स्थापन केलेली रामकृष्ण मिशन ही संस्था शिस्त, भक्ती, उत्तरदायित्व व सर्वधर्मसमभावासाठी प्रसिद्ध आहे.



आपल्या सर्व उपक्रमात रामकृष्ण मिशन सर्व धर्म, जाती व पंथाच्या विद्यार्थ्यांना सहभागी करून घेते हे सर्वधर्मसमभावाचे उत्तम उदाहरण असल्याचे राज्यपालांनी सांगितले. समाजाकडून घेतलेल्या दानाचा मिशन कसा विनियोग करते, हे पारदर्शीपणे समाजापुढे मांडत असल्याबद्दल राज्यपालांनी रामकृष्ण मिशनचे कौतुक केले.

अगोदर बिझनेस क्लास आता इकॉनॉमी क्लासने प्रवास

पूर्वी आपण गारमेंट निर्यातदार असताना बिझनेस क्लासने प्रवास करीत असायचो. त्यावेळी पैसा स्वतःचा असायचा. परंतु राज्यपाल झाल्यानंतर आपण इकोनॉमी क्लासने प्रवास करतो कारण आपल्यासाठी खर्च होत असलेला पैसा जनसामान्यांचा आहे ही जाणीव आपण नेहमी बाळगतो असे राज्यपाल राधाकृष्णन यांनी यावेळी सांगितले.

रामकृष्ण मिशन मुंबईचे अध्यक्ष स्वामी सत्यदेवानंद यांनी स्वागतपर भाषण केले तर मिशनच्या धर्मादाय हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. स्वामी दयाधिपानंद यांनी हॉस्पिटल तसेच युवकांसंबंधी उपक्रमाबद्दल अहवाल सादर केला. मिशनचे व्यवस्थापक स्वामी तन्नमानंद यांनी मिशनच्या बेलूर मठ येथे झालेल्या वार्षिक सभेच्या अहवालाचे वाचन केले. रामकृष्ण मिशन मुंबईचे सहाय्यक सचिव स्वामी देवकांत्यानंद यांनी आभार प्रदर्शन केले. संयोजक शंतनू चौधरी यांनी सूत्रसंचालन केले तर विवेकानंद स्टडी सर्कलचे सदस्य डॉ हार्दिक गुप्ता व आराधना धार यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला मिशनचे वरिष्ठ साधू तसेच विवेकानंद स्टडी सर्कलचे सदस्य व शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

# शक्तिपीठ महामार्गाचे काम सुरु करावे - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी**

राज्यातील दळणवळण सुविधा तसेच व्यावसायिक संधी आणि पर्यटनाला गती देणाऱ्या शासनाच्या महत्वाकांक्षी शक्तिपीठ महामार्गाच्या कामाचे नियोजन सर्वांना विश्वासात घेऊन तत्परतेने सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधितांना दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आगामी शंभर दिवसात सार्वजनिक बांधकाम विभागाने करावयाच्या कामकाजाचा आढावा मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी घेतला. बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मेघना साकोरे बोर्डीकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, सचिव सदाशिव साळुंखे (रस्ते), सचिव संजय दशपुते (बांधकामे), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फ़डणवीस यांनी राज्यातील महामार्गाची उभारणी आणि रस्त्यांचे जाळे दर्जेदार आणि अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाने नियोजन करण्याचे सूचित करुन सांगितले की, राज्यातील धार्मिक स्थळांना जोडणाऱ्या आणि पर्यटन उद्योगाला प्रोत्साहन देणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाची उभारणी दर्जेदार आणि गतिमानतेने करावयची असून सर्वांना विश्वासात घेऊन त्यासाठीची प्रक्रिया सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले. समृद्धी महामार्गाचे उर्वरित अंतिम टप्प्याचे आमणेपर्यंतचे ७६ कि.मी. काम तत्परतेने पूर्ण करुन फेब्रुवारीपर्यंत हा महामार्ग पूर्णपणे खुला करावा. तसेच यावर्षी समृद्धी महामार्गाचे कर्जरोखे प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. प्रवाशांना उपयुक्त ठरणाऱ्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील १३.३० कि.मी. मिसिंग लिंकचे कामही गतीने पूर्णत्वास न्यावे. नाशिक-मुंबई या राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा करण्याचे काम ही तातडीने पूर्ण करावे. मंत्रालय परिसरात नवीन सात मजली इमारतीची उभारणी कामाची सुरुवात करण्यात यावी. सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कामांची गुणवत्ता तपासण्याची जबाबदारी संबंधितांकडून योग्यरित्या पार पाडली जाणे आवश्यक असून त्याचे नियंत्रण करणारी यंत्रणा विभागाने कार्यान्वित करावी. विभागाच्या आर्थिक सक्षमतेसाठी नियोजन विभागाच्या निर्देशानुसार आर्थिक प्रारुप तयार करावे. रस्त्यांच्या निर्मितीसाठी भूसंपादन प्रक्रिया शासनाने करुन रस्त्याचे काम बीओटी तत्वावर करण्याचे धोरण स्वीकारावे. विविध विभागांच्या बांधकामांसंदर्भात केंद्रीय कार्यपद्धती अंमलात आणणे गरजेचे आहे. त्यासाठी बांधकाम विभागातच संबंधित विभागांच्या बांधकामासाठीचा स्वतंत्र कक्ष तयार करण्यात येईल. रस्त्यांच्या दुर्तफ़ा वृक्ष लागवड करताना भविष्यातील रस्ता विस्तारीकरणाची निकड लक्षात घेऊन वृक्षसंगोपन करणात यावे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन दर्जेदार आणि गतिमान कामे करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विभागामार्फत गुणवत्तापूर्ण आणि गतिमानतेने काम करण्यास प्राधान्य देण्यात येणार असून विभागाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणि कालमर्यादा प्रामुख्याने पाळण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच महामार्गावर प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध असण्यावर, प्राधान्याने महिला प्रवाशांसाठी प्रसाधनगृहांची सुविधा उपलब्ध करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगितले. विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती म्हैसकर यांनी विभागाच्या आगामी शंभर दिवसांच्या नियोजनाबाबत माहिती देताना कार्यक्षमता, गुणवत्ता, पारदर्शकता याला प्राधान्य देत विभागाच्या माध्यमातून येत्या शंभर दिवसांत विविधांगी महत्त्व पूर्ण प्रकल्प पूर्णत्वास नेण्यात येणार असून विभागाच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने राबवण्यात येणाऱ्या कामांची सविस्तर माहिती दिली.

# '२०२४' हे सर्वात 'उष्ण वर्ष'

**जीनिव्हा** – जागतिक हवामान संघटनेने सहा आंतरराष्ट्रीय डेटासेटच्या आधारे २०२४ हे वर्ष रेकॉर्डवरील सर्वात उष्ण वर्ष असल्याची पुष्टी केली आहे. गेल्या दहा वर्षांत विक्रमी तापमानाच्या असाधारण मालिकेत २०२४ हे वर्ष टॉप टेनमध्ये होते.

युरोपियन हवामान एजन्सी कोपर्निकसने शुक्रवारी पुष्टी केली होती की, २०२४ हे वर्ष रेकॉर्डवरील सर्वात उष्ण वर्ष होते. त्यानंतर जागतिक हवामान संघटनेनेदेखील नुकतेच जागतिक सरासरी तापमान पूर्व पातळीपेक्षा १.५ अंश सेल्सिअस होते. १८५० मध्ये जागतिक तापमानाची नोंद सुरू झाल्यापासून २०२४ सर्वांत उष्ण वर्ष ठरल्याचे जगभरातील अनेक वामान संस्थांनी म्हटले आहे.

जुलै ते डिसेंबर सर्वात उष्ण कोपर्निकस क्लायमेट चेंज सर्व्हिसमधील शास्त्रज्ञांच्या मते, १८५० मध्ये जागतिक तापमानाचा मागोवा घेण्यास सुरुवात झाल्यापासून २०२४ हे सर्वात उष्ण वर्ष होते. मागील वर्षातील जानेवारी ते जून २०२४ हा प्रत्येक महिना त्या महिन्यातील सर्वात उष्ण होता. ऑगस्ट वगळता जुलै ते डिसेंबर हा प्रत्येक महिना २०२३ नंतरचा सर्वात उष्ण महिना होता, असे जागतिक हवामान संघटनेने दिलेल्या अहवालात म्हटले आहे. २०२४ मधील जागतिक तापमानाचे सरासरी प्रमाण १५.१ अंश सेल्सिअस होते. ते १९९१-२०२० च्या सरासरीपेक्षा ०.७२ अंशानी जास्त होते. तसेच २०२३ च्या मागील वक्रमापेक्षादेखील तापमान ०.१२ अंशाने जास्त असल्याचे देखील अहवालात म्हटले आहे. शास्त्रज्ञांनी नोंदवले की, २०२४ मधील सरासरी तापमान १८५०-१९०० च्या बेसलाइनपेक्षा १.५५ अंश सेल्सिअस जास्त होते. संपूर्ण कॅलेंडर वर्षात सरासरी जागतिक तापमान १८५०-१९०० च्या सरासरीपेक्षा १.५ अंश सेल्सिअस जास्त राहण्याची ही पहिलीच वेळ आहे. पॅरिस करारात नमूद केलेल्या १.५ अंश सेल्सिअस तापमान मर्यादेचे कायमचे उल्लंघन म्हणजे २० किंवा ३० वर्षांच्या कालावधीत होणारी दीर्घकालीन तापमानवाढ. असे असले तरी तज्ज्ञांना वाटते की, जग आता अशा टप्प्यात प्रवेश करत आहे. जिथे तापमान सातत्याने या मर्यादेपेक्षा जास्त असेल.

# अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या महाराष्ट्र प्रदेश मुख्य कार्यकारी अध्यक्ष मिडीया विभागपदी फिरोज शेख यांची निवड

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

येथील पत्रकार तथा सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असलेले, छत्रपती संभाजीनगरसह अन्य जिल्ह्यात व राज्यात विविध क्षेत्रात चांगले कार्यात अग्रक्रमांकावर असणारे फिरोज शेख यांची अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या महाराष्ट्र प्रदेश मुख्य कार्यकारी अध्यक्ष मिडीया विभागपदी निवड करण्यात आली. त्यांच्या नि:स्वार्थपणे कार्य करण्याची तसेच वेळप्रसंगी, संकटप्रसंगी धावून येण्याच्या वृत्तीची दखल घेवून त्यांच्यावर नवी जबाबदारी टाकण्यात आली आहे.



फिरोज शेख यांना अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीच्या महाराष्ट्र प्रदेश मुख्य कार्यकारी अध्यक्ष मिडीया विभाग या पदावर महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा ॲड.राणीताई स्वामी यांच्या शिफारशीने व राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्ती देण्यात आली. फिरोज शेख यांना त्यांच्या नातेवाईकांनी, हितचिंतकांनी, मित्रमंडळीनी निवडीनिमित्त तसेच पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# छत्रपती महाराणी ताराबाई यांचे कार्य सर्वदूर जाण्यासाठी लेखणीची गरज - श्रीमंत शाहू महाराज छत्रपती

**कोल्हापूर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती ताराबाई यांच्या कार्याची स्फूर्ती घेऊन आत्ताच्या पिढीने पुढे जात राहिले पाहिजे यासाठी त्यांचा इतिहास प्रत्येकाला माहित असणे गरजेचे असून त्यांनी केलेले कार्य लेखणीतून समोर येणे आवश्यक आहे. ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या पुस्तकातून छत्रपती ताराबाई यांचा इतिहास सर्वांपर्यंत पोहोचेल अशी आशा श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांनी व्यक्त केली.

महाराणी ताराबाई यांच्या ३५० व्या जयंती वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्वांचा एक भाग म्हणून महाराणी ताराबाई यांच्या जीवनकार्याची माहिती देणाऱ्या चित्ररथाची बांधणी करण्यात आलेली असून त्याचे भव्य उद्घाटन छ.शाहू महाराज समाधी स्थळ, नर्सरी बाग, कोल्हापूर येथे करण्यात आले.

महाराणी ताराबाई यांच्या जीवनावर आधारीत विशेष चित्ररथाची संकल्पना ॲड. आशिष शेलार मंत्री सांस्कृतिक कार्य यांची असून विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा अपर मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनातून चित्ररथाची निर्मिती झाली आहे. उद्घाटन प्रसंगी श्रीमंत शाहू महाराज छत्रपती, हसन मुश्रीफ, मंत्री वैद्यकीय शिक्षण, खासदार धनंजय महाडिक, इतिहास तज्ज्ञ जयसिंगराव पवार तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी मान्यवर या सर्वांच्या हस्ते विशेष चित्ररथाचे



उद्घाटन करण्यात आले. मंत्री सांस्कृतिक कार्य आशिष शेलार हे ऑनलाइन उपस्थित होते. हा चित्ररथ कोल्हापूर शहर व जिल्ह्यात विविध ठिकाणी प्रदर्शित करण्यात येणार आहे.

**महाराणी ताराबाई यांचा पराक्रम महानच - मंत्री हसन मुश्रीफ**

छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले मराठा साम्राज्य पुढे चांगल्या प्रकारे महाराणी ताराबाई यांनी चालवले. त्यांनी दिलेला लढा आणि त्यांचे कार्य महानच असून त्यांचा इतिहास सर्वांना कळवा, त्यांनी केलेल्या महान कार्याची ओळख सर्वांना व्हावी यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाने आयोजित केलेला हा कार्यक्रम अतिशय अभिनंदनीय असल्याचे मंत्री हसन मुश्रीफ यांनी उद्घाटन कार्यक्रमावेळी सांगितले.

**ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या छत्रपती ताराबाई यांच्या पुस्तकातून त्यांचा इतिहास राज्याला प्रेरक ठरेल - आशिष शेलार**

कोणताही इतिहास उद्याचे भविष्य घडवतो. महाराणी ताराबाई यांनी मराठा साम्राज्यासाठी दिलेले योगदान तसेच त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन ही संकल्पना सांस्कृतिक कार्य विभागाकडून राबविण्यात येत आहे. ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ जयसिंगराव पवार यांनी लिहिलेल्या छत्रपती ताराबाई यांच्या पुस्तकातून त्यांचा इतिहास नक्कीच राज्याला प्रेरक ठरेल असे मत सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी व्यक्त केला.

ते दूरदृश्य प्रणालीद्वारे चित्ररथाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. ते म्हणाले छत्रपती ताराबाई यांचा लढा, त्यांचे नेतृत्व जनतेसमोर आणायचे आहे. यासाठी चित्ररथ तसेच विविध प्रदर्शनातून लोकांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी राज्यातील सहा विभागात सहा ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. तसेच येत्या काळात छत्रपती ताराबाई यांच्या नावाने टपालाचे तिकीटही प्रसिद्ध केले जाणार आहे. येत्या वर्षभरात छत्रपती ताराबाई यांच्यावर आधारित विविध नाटकांचे आयोजनही करण्यात येणार आहे. त्यांचे शौर्य, इतिहास चांगल्या प्रकारे लोकांच्या समोर येईल. तसेच मंत्री हसन मुश्रीफ्फ यांनी मागणी केल्यानुसार जयसिंगराव पवार यांचे पुस्तकही सर्वांसमोर पोहोचेल यासाठी नियोजन केले जाईल असे ते म्हणाले. अभ्यासक, इतिहास संशोधक व नागरीकांनी या महाराणी ताराराणी यांच्या जीवनावर आधारीत विशेष चित्ररथाचा लाभ घ्यावा असे आवाहन आवाहन मंत्री शेलार यांनी यावेळी केले. ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ जयसिंगराव पवार यांनी महाराणी ताराबाई यांनी केलेल्या कार्याची माहिती थोडक्यात सांगितली. खासदार धनंजय महाडिक यांनीही या कार्यक्रमासाठी शुभेच्छा देऊन महाराणी ताराबाई यांच्या कार्याबाबत थोडक्यात माहिती दिली. कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने झाली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रस्ताविक सहसंचालक सांस्कृतिक कार्य विभाग श्रीराम पांडे यांनी केले तर आभारही त्यांनीच मानले.

## रणगाडाविरोधी क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

भारताने नाग एमके-२ या स्वदेशी तिसऱ्या पिढीच्या रणगाडाविरोधी क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी एक्स पोस्ट करुन ही माहिती दिली. राजनाथ सिंह यांनी यशस्वी चाचणीसाठी डीआरडीओ, नाग क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमात सहभागी असलेल्यांचे पथक आणि लष्कराचे अभिनंदन केले. राजस्थानमध्ये पोखरण येथे फिफ्ल्ड रेंजवर नाग एमके-२ या रणगाडाविरोधी क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी करण्यात आली. पोखरणमध्येच नाग क्षेपणास्त्र वाहक आवृत्ती-२ ची पण यशस्वी चाचणी करण्यात आली. या यशस्वी चाचण्यांमुळे नाग एमके-२ रणगाडाविरोधी क्षेपणास्त्र लष्कराच्या सेवेत दाखल करण्यासाठी सज्ज झाले आहे.

## खोखो वर्ल्डकपमध्ये भारताची विजयी सलामी, नेपाळला हरवले

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

पहिल्यावहिल्या खोखो वर्ल्डकपच्या(घहे घहे थींश्रव र्ल्ीं २०२५) पहिल्याच सामन्यात यजमान भारताने विजयी सलामी दिली आहे. भारताने पहिल्याच सामन्यात नेपाळला ४२-३७ असे हरवले. भारताने नेपाळविरुद्ध सुरूवातीला टॉस जिंकतच विजयी सुरूवात केली होती. त्यानंतर त्यांनी अटॅकची बाजू घेतली. यावेळेस भारताने पहिल्या टर्नमध्ये २४ पॉईट मिळवले. त्यानंतर भारताने नेपाळला २० पॉईट्सवर रोखले. त्यानंतर दुसऱ्या डावात भारताने पुन्हा आक्रमण करताना २२ गुण मिळवले. त्यामुळे भारताची आघाडी वाढली. त्यानंतर नेपाळचे आक्रमण थोपवताना त्यांना ३७ गुणांवर रोखत आपला पहिला सामना जिंकला.

## सोयाबीन खरेदीस ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ; मुख्यमंत्र्यांची मागणी केंद्रीय कृषीमंत्र्यांकडून मान्य

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ देण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विनंती केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी मान्य केली आहे. आता ही मुदत ३१ जानेवारीपर्यंत वाढवली आहे.

राज्यातील सोयाबीन खरेदीची मुदत ६ जानेवारीला संपली होती. त्यामुळे व्यापाऱ्यांकडून सोयाबीनला भाव मिळत नव्हता. हवालदिल शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय कृषिमंत्र्यांशी संपर्क साधून मुदतवाढीची मागणी केली होती. त्याला प्रतिसाद देत केंद्राने ही मुदत ३१ जानेवारीपर्यंत वाढविली. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून फडणवीस यांनी चौहान यांचे आभार मानले.

दरवर्षी पणन विभागामार्फ्त सोयाबीनची खरेदी केली जाते. ही खरेदी कोणत्याही अडथळ्याशिवाय होण्यासाठी विभागाने कायमस्वरूपी यंत्रणा उभारावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फ्फडणवीस यांनी पणन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. सह्याद्री अतिथीगृह येथे पणन विभागाकडून १०० दिवसांमध्ये करण्यात येणाऱ्या कामांचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. समृद्धी महामार्गालगत उभारण्यात येणारे 'ॲग्रो हब', 'मॅग्नेट' प्रकल्पाअंतर्गत उभे करावेत. या ठिकाणी सर्व-सोयी सुविधा उभारण्यात याव्यात. या 'ॲग्रो हब'साठीचा आराखडा तयार करून सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

**मुख्यमंत्र्यांच्या सूचना**

- पुढील वर्षापासून सोयाबीन खरेदीसाठीची तयारी, शेतकऱ्यांची नोंदणी ऑक्टोबरमध्ये पूर्ण करावी.
- सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरूपी उभारण्यात येणाऱ्या व्यवस्थेचे निकष ठरवावेत.
- निकषांमध्ये सर्व सोयी-सुविधांचा अंतर्भाव असावा, अडचणीशिवाय सोयाबीन खरेदी सुरू राहण्यासाठी यंत्रणा उभी करावी.
- राज्यातील चारही विभागांसाठीच्या 'ॲग्रो लॉजिस्टिक हब'चा प्रस्ताव सादर करावा.
- कांदा चाळींची संख्या वाढवावी.

## कुणाचेही लागेबंधे असले तरीः आरोपीस फाशीची शिक्षा व्हावी, यासाठी सरकार सर्व कायदेशीर प्रक्रिया पार पाडेल - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा इशारा

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

संतोष देशमुख हत्याप्रकरणाला महिना उलटला तरीही त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळालेला नाही. वाल्मिक कराडविरोधात मकोका लावण्यात आलेला नाही. तसेत कृष्णा आंधळे हा आरोपी अद्यापही फरार आहे. यामुळे देशमुख कुटुंबियांसह मस्साजोगच्या गावकऱ्यांनी संताप व्यक्त केला असून आज (दि. १३ जानेवारी) संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी आंदोलन केलं.

या विषयावर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आता भाष्य केलं आहे. एकनाथ शिंदे दोन दिवसांसाठी सातारा जिल्ह्यातील दरे गावी गेले आहेत. येथील माध्यमांनी त्यांना विविध प्रश्नांवर बोलतं केलं. संतोष देशमुख प्रकरणावर बोलत असताना त्यांनी म्हटले की, आरोपीचे कुणाशी जरी लागेबांधे असले तरी त्यांना सोडले जाणार नाही.

**एकनाथ शिंदे काय म्हणाले?**

संतोष देशमुख प्रकरण अतिशय दुर्दैवी आहे. अतिशय निर्घृणपणे त्यांची हत्या झाली असून माणुसकीला काळीमा फासणारी घटना आहे. शासनाने हे प्रकरण गांभीर्यानं घेतलं आहे. मुख्यमंत्र्यांनी एसआयटी नेमली असून सीआयडीही चौकशी करत आहे. आरोपींना मकोका लावण्यात आला आहे. या प्रकरणातील एकही आरोपी सुटणार नाही.

आरोपीचे कुणाशीही लागेबांधे असले तरी सरकार कुणालाही पाठिशी घालणार नाही. आरोपींनी ज्या निर्घृण पद्धतीने हत्या केली, तशाच प्रकारे त्यांनाही फाशीची शिक्षा व्हावी, यासाठी सरकार सर्व कायदेशीर प्रक्रिया पार पाडेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.



संतोष देशमुखांना भीती वाटत होती, गुंड प्रवृत्तीचे लोकः, हत्येच्या दोन दिवस आधी काय घडलं? पत्नीने सांगितला घटनाक्रम!

संतोष देशमुख प्रकरणात भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी पहिल्या दिवसापासून आक्रमक भूमिका घेत, हे प्रकरण लावून धरले. त्यांचा उल्लेख करत एकनाथ शिंदे म्हणाले की, एका लोकप्रतिनिधीची अशा निर्घृण पद्धतीने हत्या होत असेल तर कुणीही शांत बसणार नाही. आम्हीही त्यांना न्याय देण्यासाठी सर्व प्रयत्न करून.

**धनंजय देशमुख यांचा आत्महत्या करण्याचा प्रयत्न**

संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांना धमक्या दिल्या जात आहेत. तसेच पोलीस तपासावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. यासाठी आज त्यांनी मोबाइल टॉवरवर चढून जीव देणार असल्याचा इशारा त्यांनी दिला होता. त्यानुसार आज ते टॉवरवर चढले.

तर, मस्साजोगच्या ग्रामस्थांनी देखील गावात तीव्र आंदोलन केलं. धनंजय देशमुखांनी आत्महत्या करू नये यासाठी प्रशासन व अनेक नेत्यांनी त्यांची विनंती केली. मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे पाटील यांनी देखील धनंजय देशमुखांना विनवण्या केल्या. त्यानंतर तब्बल दोन तासांनी त्यांनी आपलं आंदोलन थांबवलं व ते टॉवरवरून खाली उतरले.

# रशिया - युक्रेन युद्धात भारतीयाचा मृत्यू

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

रशिया - युक्रेन युद्धात एका भारतीयाचा मृत्यू झाला आणि एक भारतीय गंभीर जखमी झाला आहे. हाती आलेल्या माहितीनुसार ३२ वर्षांचा बिनिल टी बी रशिया - युक्रेन युद्धात ठार झाला. बिनिलचा नातलग असलेला जैन टी के हा युद्धात गंभीर जखमी झाला. सध्या जैन टी के याच्यावर उपचार सुरू आहेत. बिनिल टी बी आणि जैन टी के हे दोघेही मूळचे केरळमधील थ्रिसूर जिल्ह्यातील वडक्कनचेरीचे रहिवासी आहेत. झटपट भरपूर पैसे कमावण्यासाठी त्यांनी रशियाच्या लष्करात सहाय्यक म्हणून नोकरी करायला सुरुवात केली होती. नोकरीमुळेच ते युद्ध क्षेत्रात वावरत होते.

रशिया सरकारने बिनिल टी बी याचा मृत्यू झाल्याची माहिती भारतातील त्याच्या कुटुंबाला कळवली आहे. तसेच जैन टी के हा गंभीर जखमी असल्याचे रशिया सरकारने त्याच्या भारतातील कुटुंबाला कळवले आहे. मॉस्कोतील भारतीय दूतावासाने फ्फोन करुन बिनिलच्या मृत्यूची बातमी त्याची पत्नी जॉयसी हिला कळवली. पण भारत सरकारने अधिकृतरित्या अद्याप बिनिलच्या मृत्यूची बातमी त्याच्या कुटुंबाला कळवलेली नाही.

रशिया - युक्रेन युद्धाला सुरुवात झाल्यावर झटपट भरपूर पैसे कमावण्यासाठी केरळमधील अनेक तरुणांनी रशियाच्या सैन्यात वेगवगेळ्या पदांसाठी अर्ज केला होता. यापैकी अनेकजण सध्या युद्ध क्षेत्रात कार्यरत आहेत. या तरुणांबाबतची ठोस आकडेवारी केरळ सरकारने संकलित स्वरुपात जाहीर केलेली नाही. यामुळे नेमके किती तरुण केरळमधून रशियात गेले आहेत आणि तिथून परत येण्यास इच्छुक असलेल्यांची संख्या किती मोठी आहे हे प्रश्न अद्याप गुलदस्त्यात आहेत.

बिनिल इलेक्ट्रिशिअन होता, त्याच्यासारख्याच असलेल्या केरळमधील अनेकांनी प्लंबर, इलेक्ट्रिशिअन, वायरमन, कुक, ड्रायव्हर अशा प्रकारच्या लष्करी सहाय्यकाच्या जबाबदाऱ्यांसाठी अर्ज केला होता. सुरुवातीला पैशांसाठी गेलेली ही मंडळी युद्ध लांबू लागल्यामुळे आणि दक्षिण भारताच्या तुलनेत प्रतिकूल असलेल्या वातावरणात दीर्घ काळ राहिल्यामुळे मायदेशी परतण्यास इच्छुक असल्याचे वृत्त आहे. मुळात लष्करी सेवेत नसल्यामुळे केरळमधून रशियात लष्करी सहाय्यक म्हणून गेलेल्या तरुणांसाठी त्यांची परदेशातली नोकरी ही अवघड जागेचे दुखणे झाली

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816